# श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

# शिवचरित्र स्पर्धा

**छत्रपती शिवाजीमहाराज**
**इ. ७ वी स्तर**

**दिनांक : शनिवार, १५ फेब्रुवारी २०२०** | **एकूण गुण : १००** | **वेळ : १ तास**

**सूचना :**

1) तुमची उत्तरे स्वतंत्रपणे दिलेल्या उत्तरपत्रिकेवर लिहा. त्यासाठी निळे किंवा काळे बॉलपेन वापरावे.

2) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य उत्तराच्या क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.

उदा. ● १ ○ २ ○ ३ ○ ४

3) जर तुमचे उत्तर चुकीचे आहे असे वाटल्यास व तुम्हाला दुरूस्त करावयाचे असेल तर चुकीच्या वर्तुळावर पुढे दाखविल्याप्रमाणे फुली मारा व योग्य वर्तुळ रंगवा. एकाच प्रश्नासाठी एकापेक्षा जास्त वर्तुळे रंगविल्यास गुण दिले जाणार नाहीत.

उदा. ⊗ 1 ○ 2 ○ 3 ○ 4

4) एकूण **50** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **2** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य.

**प्रश्न क्र. १ :** ग्रीस या देशाच्या कोणत्या राजाने भारतीय भूमीवर २५०० वर्षांपूर्वी आक्रमण केले होते?

**१) निकोलाय मनुची** **२) ॲलेक्झांडर**
**३) टॉमस निकल्स** **४) हेन्री ऑक्झिंडन**

**प्रश्न क्र. २ :** सन १५२६ मध्ये बाबराने कोणत्या सत्तेचा पाया घातला?

**१) कुतुबशाही** **२) आदिलशाही**
**३) निजामशाही** **४) मुघल**

**प्रश्न क्र. ३ :** शिवरायांचे वडील शाहजीराजे यांचा जन्म किती साली झाला?

**१) १५९६ २) १५९७ ३) १५९८ ४) १५९९**

**प्रश्न क्र. ४ :** शिवजन्माच्या वेळी शिवनेरी किल्ल्याचे किल्लेदार कोण होते?

**१) विश्वासराव** **२) निळकंठराव सरनाईक**
**३) हंसाजी मोहिते** **४) लखुजी जाधवराव**

**प्रश्न क्र. ५ :** शिवजन्माचे वेळी शहाजीराजे कोणाशी लढायला गेले होते?

**१) निजामशहा** **२) आदिलशहा**
**३) दर्याखान रोहिला** **४) लखुजी जाधवराव**

**प्रश्न क्र. ६ :** १६३६ साली मुर्तझा निजामशाहाला मुघलांच्या हाती सोपवून शाहजीराजांनी कोणाची नोकरी स्वीकारली?

**१) मुघल** **२) विजापूरची आदिलशाही**
**३) कुतुबशाही** **४) यापैकी कोणीही नाही.**

**प्रश्न क्र. ७ :** पुणे परिसराची दैना कोणी उडविली होती?

**१) रायाराव** **२) अफझलखान**
**३) औरंगजेब** **४) बहमनी सुलतान**

**प्रश्न क्र. ८ :** शाहजीराजांनी बाल शिवबाबरोबर पुणे ह्या जहागिरीच्या प्रदेशात बाळकृष्ण हणमंते यांना .... केले.

**१) पेशवे** **२) मुजुमदार**
**३) मजालसी** **४) सबनीस**

**प्रश्न क्र. ९ :** शाहजीराजांकडे पुणे परगणा आणि त्याखालील बारा मावळांची जहागीर होती. जहागीर किंवा जागीर म्हणजे ....

**१) स्वतंत्र राजा.**
**२) बादशहा.**
**३) वसूल उपभोगण्याचा अधिकार होय.**
**४) यापैकी काहीही नाही.**

**प्रश्न क्र. १० :** शिवाजी महाराजांच्या काळात गावच्या प्रमुख वतनदारास काय म्हणत?

**१) चौगुला** **२) कुलकर्णी**
**३) येसकर** **४) पाटील**

**प्रश्न क्र. ११ :** शिवाजीराजांनी राजगड बांधण्यापूर्वी त्या डोंगराचे नाव काय होते?

**१) गुढ्यादुर्ग** **२) मुरुंबदेव**
**३) कोंडाणा** **४) संग्रामदुर्ग**

**प्रश्न क्र. १२ :** शिवरायांची संस्कृत भाषेतील मुद्रा कोणत्या आकारात होती?

**१) पंचकोनी** **२) चौकोनी**
**३) षटकोनी** **४) अष्टकोनी**

**प्रश्न क्र. १३ :** 'मर्यादेयं विराजते' या मुद्रेचा अर्थ काय होतो?

**१) येथे लिखाण सुरू होते**
**२) लेखनसमाप्ती**
**३) हे लिखाण सत्य आहे**
**४) यापैकी एकही अर्थ नाही**

**प्रश्न क्र. १४ :** सन १६४८ मध्ये कोंढाणा ताब्यात येताच शिवाजीराजांनी .... ह्या गावाजवळचा भुईकोट सुभानमंगळ ताब्यात घेतला.

**१) चाकण** **२) उदगीर**
**२) शिरवळ** **४) यापैकी काही नाही.**

**प्रश्न क्र. १५ :** मुस्तफाखानाने शाहजीराजांना कैद केले. तेव्हा .... हे सहकारी त्यांचेसोबत होते.

**१) बाजी जेधे** **२) कान्होजी जेधे**
**३) गोदाजी जगताप** **४) शिवाजी इंगळे**

**प्रश्न क्र. १६ :** स्वराज्यावरील पहिल्या मोठ्या आक्रमणात फतहखानाचा पराभव शिवरायांनी कोणत्या किल्ल्यावर केला?

**१) प्रतापगड** **२) पुरंदर**
**३) राजगड** **४) तोरणा**

**प्रश्न क्र. १७ :** फतहखानाच्या सैन्याचा मराठ्यांनी पाठलाग केला. तेव्हा झालेल्या चकमकीत शिवाजीराजांचे शूर सरदार .... यांनी बलिदान दिले.

**१) कान्होजी जेधे** **२) मुरारबाजी**
**३) वीर बाजी पासलकर** **४) तानाजी मालुसरे**

**प्रश्न क्र. १८ :** शिवाजीराजांना कोणी पाठविलेल्या पत्रात 'येता जावली जाता गोवली' हे वाक्य आले आहे.

**१) अफझलखान** **२) चंद्रराव मोरे**
**३) बाजी घोरपडे** **४) मीर जुमला**

**प्रश्न क्र. १९ :** १६५५-५६ च्या चंद्रराव मोरे यांच्यावरील स्वारीसाठी शिवाजीराजे स्वतः कोणत्या वाटेने जावळीत उतरले?

**१) रडतोंडीचा घाट** **२) आंबेनळी घाट**
**३) कावळ्या घाट** **४) निसणीचा घाट**

**प्रश्न क्र. २० :** शिवरायांचे पुत्र संभाजीराजे यांचा जन्म कोणत्या किल्ल्यावर झाला?

**१) प्रतापगड** **२) राजगड**
**३) तोरणा** **४) पुरंदर**

**प्रश्न क्र. २१ :** खालीलपैकी कोण औरंगजेबाचा भाऊ नव्हता?

**१) दारा शुकोह** **२) मुरादबख्श**
**३) सुलेमान शुकोह** **४) शाह सुजा**

**प्रश्न क्र. २२ :** औरंगजेबाने सत्ता मिळविण्यासाठी शाहजहानला कैद केले आणि तो .... मध्ये मुघलांचा बादशहा बनला.

**१) आग्रा** **२) दिल्ली** **३) मथुरा** **४) विजापूर**

**प्रश्न क्र. २३ :** मध्ययुगात हिंदुस्थानच्या / महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर नावारुपाला आलेल्या बंदरात खालीलपैकी कोणत्या बंदराचा समावेश नव्हता?

**१) दाभोळ** **२) राजापूर**
**३) न्हावाशेवा** **४) वेंगुर्ला**

**प्रश्न क्र. २४ :** 'तुमच्या मुलाला आवरा आणि त्याला शिक्षा करा' असे शाहजीराजांना कोणत्या दरबारने बजाविले?

**१) निजामशाही** **२) मुघल**
**३) विजापूर** **४) गोवळकोंडा**

**प्रश्न क्र. २५ :** कर्नाटकातील नंदी नावाच्या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या गावी बांधलेल्या तळ्याचे नाव काय?

**१) शाहसागर** **२) जिजासागर**
**३) मालसमुद्रम** **४) भोसलेसागर**

**प्रश्न क्र. २६ :** शिवाजीराजांतर्फे अफझलखानाशी वाटाघाटी करण्यास शिवरायांनी कोणाला पाठविले?

**१) पंताजी गोपीनाथ** **२) कृष्णाजी भास्कर**
**३) सोनोपंत डबीर** **४) मोरोपंत पिंगळे**

**प्रश्न क्र. २७ :** अफझलखानाचा अंगरक्षक बडा सय्यद याचा वध कोणी केला?

**१) जिवा महाला** **२) संभाजी कावजी**
**३) शिवाजीमहाराज** **४) नेताजी पालकर**

**प्रश्न क्र. २८ :** अफझलखानाच्या वधानंतर आदिलशाहीने कोणत्या सरदाराच्या नेतृत्वाखाली शिवरायांवर फौज पाठविली?

**१) सिद्दी मसूद** **२) सिद्दी जौहर**
**३) हेन्री रिव्हिंग्टन** **४) फतहखान**

**प्रश्न क्र. २९ :** शिवरायांचे खंदे पाठीराखे असणाऱ्या कान्होजी जेधे यांचा १६६० मध्ये कोणत्या गावी मृत्यू झाला?

**१) आंबवडे** **२) कारी**
**३) राजगड** **४) पुणे**

**प्रश्न क्र. ३० :** अश्विन शुद्ध पंचमी शके १५८३ / १६६१ साली तुळजाभवानी या कुलस्वामिनीची स्थापना शिवाजीमहाराजांनी कोणत्या किल्ल्यावर केली?

**१) प्रतापगड** **२) राजगड**
**३) रायगड** **४) पुरंदर**

**प्रश्न क्र. ३१ :** स्वराज्यावर आक्रमण करण्यासाठी आलेला शायस्ताखान किती साली पुण्यात दाखल झाला?

**१) १६५९** **२) १६६०** **३) १६६१** **४) १६६२**

**प्रश्न क्र. ३२ :** शायस्ताखानाच्या फौजेविरुद्ध चाकणचा संग्रामदुर्ग तब्बल ५६ दिवस लढविणाऱ्या शूरवीराचे नाव काय?

**१) नेतोजी पालकर** **२) तानाजी मालुसरे**
**३) प्रतापराव गुजर** **४) फिरंगोजी नरसाळा**

**प्रश्न क्र. ३३ :** २ फेब्रुवारी १६६१ रोजी ------- या मोगली सरदाराचा उंबरखंडात शिवाजीमहाराजांनी पूर्ण पराभव केला.

**१) कारतलबखान** **२) फतहखान**
**३) अफझलखान** **४) बाजी घोरपडे**

**प्रश्न क्र. ३४ :** शिवरायांनी शायस्ताखानावर छापा घातल्यानंतर धास्ती घेऊन किती दिवसांनी शायस्ताखान पुणे सोडून निघून गेला?

**१) बारा** **२) आठ** **३) पाच** **४) तीन**

**प्रश्न क्र. ३५ :** शाहजीराजांचा २३ जानेवारी १६६४ रोजी कोणत्या ठिकाणी मृत्यू झाला?

**१) विजापूर** **२) तंजावूर**
**३) होदिगेरे** **४) गदग**

**प्रश्न क्र. ३६ :** तळकोकणातील मालवणजवळच्या ---- या बेटावर शिवाजीमहाराजांनी एका नव्याच जलदुर्गाची उभारणी करून त्याला सिंधुदुर्ग असे नाव दिले.

**१) कुरटे   २) नवघर   ३) मुंबई   ४) खांदेरी**

**प्रश्न क्र. ३७ :** औरंगजेबाने १६६४ साली मिर्झाराजांची नेमणूक कशासाठी केली?

**१) मिर्झाराजेंना बक्षिसी म्हणून**

**२) मिर्झाराजे राजपूत होते म्हणून**

**३) शिवाजीमहाराजांच्या विरोधात मोहीम उघडण्यासाठी**

**४) मिर्झाराजेंना अनेक भाषा अवगत होत्या म्हणून**

**प्रश्न क्र. ३८ :** मिर्झाराजे जयसिंह स्वतःला कोणत्या कुळातील समजत असत?

**१) श्रीकृष्ण   २) सूर्यवंशी**

**३) प्रभू रामचंद्र   ४) यापैकी कोणतेही नाही.**

**प्रश्न क्र. ३९ :** मिर्झाराजांचा मोठा मुलगा शिवाजीमहाराजांचा आग्र्यातील प्रतिनिधी होता. त्याचे नाव काय?

**१) जसवंतसिंह   २) चंद्रसिंह**

**३) रामसिंह   ४) सूरजसिंह**

**प्रश्न क्र. ४० :** आग्र्याला शिवाजीमहाराजांना कैद करून त्यांची छावणी वेढली. त्याचा प्रमुख कोण होता?

**१) फुलादखान   २) अमीनखान**

**३) राजंदाजखान   ४) जाफरखान**

**प्रश्न क्र. ४१ :** शिवराय आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेत पडले ते संवत्सर होते 'पराभव नाम संवत्सर' पण शिवरायांनी चतुराईने त्या कैदेतून आपली सुरक्षित यशस्वी सुटका करून घेतली. तो दिवस होता

**१) १७ ऑगस्ट १६६६   २) १२ सप्टेंबर १६६६**

**३) २० नोव्हेंबर १६६६   ४) १ जानेवारी १६६७**

**प्रश्न क्र. ४२ :** मिर्झाराजे जयसिंहाचा ----- येथे विषप्रयोगाने मृत्यू झाला तो २८ ऑगस्ट १६६७ रोजी.

**१) आग्रा   २) पुरंदर**

**३) बुऱ्हाणपूर   ४) औरंगाबाद**

**प्रश्न क्र. ४३ :** शिवरायांच्या काळात गडकोटांवर किती प्रमुख अधिकारी असायचे?

**१) २   २) ३   ३) ४   ४) ५**

**प्रश्न क्र. ४४ :** अनुपुराण हा ग्रंथ कोणी रचला?

**१) कवी भूषण   २) रघुनाथपंत हणमंते**

**३) निश्चलपुरी   ४) परमानंद गोविंद नेवासकर**

**प्रश्न क्र. ४५ :** गोव्यातील कोणत्या मंदिराचा शिवरायांनी जिर्णोद्धार केला?

**१) श्रीसप्तकोटेश्वर   २) मंगेशीचा मंगेश**

**३) कवळ्याची शांतादुर्गा   ४) म्हार्दोळची महालसा**

**प्रश्न क्र. ४६ :** स्वराज्याची राजधानी रायगडाचे स्थापत्य विशारद कोण होते?

**१) हिराजी इंदुलकर   २) निंबाळकर**

**३) सूर्यराव काकडे   ४) प्रतापराव**

**प्रश्न क्र. ४७ :** १६७३ साली पन्हाळा किल्ला जिंकण्याची मोहीम शिवाजीमहाराजांनी कोणावर सोपविली?

**१) बाजीप्रभू   २) कोंडाजी फर्जंद**

**३) तानाजी मालुसरे   ४) मुरारबाजी**

**प्रश्न क्र. ४८ :** छत्रसाल बुंदेला शिवाजी महाराजांकडे कशासाठी आला होता?

**१) औरंगजेबाच्या वतीने शिष्टाई करण्यासाठी**

**२) तह करण्यासाठी**

**३) नोकरी मागण्यासाठी**

**४) यापैकी काही नाही.**

**प्रश्न क्र. ४९ :** शिवाजी महाराजांनी कासा बेटावर कोणता जलदुर्ग बांधला?

**१) विजयदुर्ग   २) सिंधुदुर्ग**

**३) जयगड   ४) पद्मदुर्ग**

**प्रश्न क्र. ५० :** दक्षिण दिग्विजयात वेल्लोर जवळच्या टेकड्यांवर शिवाजीमहाराजांनी कोणते दोन किल्ले बांधले?

**१) हरिहर, पट्टा   २) साजरा, गोजरा**

**३) कोरीगड, मानगड   ४) बळवंतगड, भैरवगड**

● ● ●

## श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

# शिवचरित्र स्पर्धा

**स्वराज्यरक्षणाचा लढा**
**इ. ८ वी, ९ वी व १० वी स्तर**

**दिनांक : शनिवार, १५ फेब्रुवारी २०२०**

**एकूण गुण : १००**
**वेळ : १ तास**

---

**सूचना :**

1) तुमची उत्तरे स्वतंत्रपणे दिलेल्या उत्तरपत्रिकेवर लिहा. त्यासाठी निळे किंवा काळे बॉलपेन वापरावे.

2) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य उत्तराच्या क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.

**उदा.** १ ● २ ○ ३ ○ ४ ○

3) जर तुमचे उत्तर चुकीचे आहे असे वाटल्यास व तुम्हाला दुरूस्त करावयाचे असेल तर चुकीच्या वर्तुळावर पुढे दाखविल्याप्रमाणे फुली मारा व योग्य वर्तुळ रंगवा. एकाच प्रश्नासाठी एकापेक्षा जास्त वर्तुळे रंगविल्यास गुण दिले जाणार नाहीत.

उदा. 1 ⊗ 2 ○ 3 ○ 4 ○

4) एकूण **50** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **2** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य.

---

**प्रश्न क्र. १ :** छत्रपती शिवाजी महाराजांचे वयाच्या कितव्या वर्षी निधन झाले?

**१) ४५ २) ५० ३) ५५ ४) ६०**

**प्रश्न क्र. २ :** शिवरायांनी महाराष्ट्रातील स्वराज्याची धुरा ...... यांनी हाती घ्यावी अशी योजना आखली होती.

**१) ताराराणी २) युवराज संभाजी ३) युवराज राजाराम ४) संताजी**

**प्रश्न क्र. ३ :** संभाजीराजांचा जन्म किती साली झाला?

**१) १६५७ २) १६५८ ३) १६५९ ४) १६६०**

**प्रश्न क्र. ४ :** शिवरायांनी शंभूराजांच्या शिक्षणासाठी कोणत्या व्यक्तीची नेमणूक केली होती?

**१) केशव पंडित २) कवि कलश ३) गागाभट्ट ४) मोरोपंत पिंगळे**

**प्रश्न क्र. ५ :** शिवराय आग्र्याहून निसटले तेव्हा त्यांचेसोबत असलेल्या संभाजीराजांचे वय किती होते?

**१) ६ २) ८ ३) १० ४) ९**

**प्रश्न क्र. ६ :** दक्षिण दिग्विजयासाठी कर्नाटक मोहिमेवर जाताना शिवाजीमहाराजांनी युवराज संभाजी यांना श्रृंगारपूर प्रभावळीचे ..... म्हणून नेमले?

**१) मामलेदार २) जकातदार ३) सुभेदार ४) वतनदार**

**प्रश्न क्र. ७ :** शिवरायांच्या मृत्यूची वार्ता संभाजीराजांना ....... येथे समजली.

**१) विशाळगड २) अजिंक्यतारा ३) राजगड ४) पन्हाळा**

**प्रश्न क्र. ८ :** ४ जानेवारी १६८३च्या सुमारास मराठ्यांनी इंग्रजांच्या ..... या जहाजावर हल्ला चढवून त्यांना अद्दल घडविली.?

**१) चेअरमन २) प्रेसिडेंट ३) सेक्रेटरी ४) गलबत**

**प्रश्न क्र. ९ :** मध्ययुगामध्ये अरब व्यापारी ..... येथे हल्ले करून तेथील रहिवाशांना कैद करून गुलाम बनवून भारतातील मुस्लीम सत्ताधीशांना विकत असत.

**१) आशिया २) युरोप ३) श्रीलंका ४) अफ्रिका**

**प्रश्न क्र. १० :** सभासद बखरकारांनी ..... तोंडी सिद्दीच्या संदर्भात असे वाक्य टाकले आहे की 'घरात जैसा उंदीर तैसा हा सिद्दी शत्रू.'

**१) शिवाजीमहाराजांच्या २) संभाजीमहाराजांच्या ३) राजाराममहाराजांच्या ४) रामचंद्रपंत अमात्यांच्या**

**प्रश्न क्र. ११ :** संभाजीराजांनी वेढा दिल्यानंतर घाबरलेल्या जंजिरेकर सिद्दीने कोणाशी संधान बांधून मदत मागितली?

**१) आदिलशहा २) औरंगजेब ३) कुतुबशहा ४) निजामशहा**

**प्रश्न क्र. १२ :** इ.स. १६६७ मध्ये पोर्तुगिजांनी उध्वस्त केलेल्या कोणत्या मंदिराचा शिवरायांनी जीर्णोद्धार केला?

**१) सप्तकोटेश्वर २) वाडेश्वर ३) मृत्युंजयेश्वर ४) ओंकारेश्वर**

**प्रश्न क्र. १३ :** गोव्याच्या जवळ असलेल्या मराठ्यांच्या ..... किल्ल्यावर पोर्तुगिजांनी हल्ला केल्याचे वर्तमान संभाजीमहाराजांना राजापूरजवळ समजले.

**१) फोंडा २) सिंधुदुर्ग ३) विजयदुर्ग ४) तेरेखोल**

**प्रश्न क्र. १४ :** अनेक वर्षांच्या संघर्षानंतरही संभाजीराजांविरुद्ध यश प्राप्त झाले नाही म्हणून मराठ्यांवरची मोहीम स्थगित करून औरंगजेबाने ..... यांच्याविरुद्ध आक्रमण करण्याची मोहीम हाती घेतली.

**१) निजामशहा** **२) विजापूरचा आदिलशहा**
**३) जंजिरेकर सिद्दी** **४) पोर्तुगिज**

**प्रश्न क्र. १५ :** औरंगजेबाने गोवळकोंड्याची कुतुबशाही नष्ट केली, तेव्हा तेथे असलेल्या कुतुबशहाचे नाव काय होते?

**१) अब्दुल्लाखान** **२) अबुल हसन**
**३) मुकर्रबखान** **४) शहा आलम**

**प्रश्न क्र. १६ :** औरंगजेबाविरुद्ध बंड करून संभाजीराजांना आश्रय मागणाऱ्या शहजाद्याचे नाव काय होते?

**१) आज्ज्ञम** **२) मुअज्ज्ञम**
**३) सिकंदर** **४) अकबर**

**प्रश्न क्र. १७ :** खालीलपैकी कोण औरंगजेबपुत्र नव्हता?

**१) अकबर** **२) शहा आलम**
**३) कामबक्ष** **४) मुराद**

**प्रश्न क्र. १८ :** मार्च १६८२च्या सुमारास मुघलांच्या शहाबुद्दीनखानाने नाशिकजवळच्या कुठल्या किल्ल्याला वेढा दिला?

**१) रामसेज** **२) भास्करगड**
**३) अहिवंत** **४) पट्टा**

**प्रश्न क्र. १९ :** महाराष्ट्रात आल्यापासून तीन वर्षे मेहनत घेऊनही निर्णायक विजय न मिळाल्याने औरंगजेबाने काय केले?

**१) संभाजीराजांशी तह केला**
**२) पुन्हा दिल्लीला गेला**
**३) आदिलशाही आणि कुतुबशाही जिंकून घेतली**
**४) यापैकी काहीही नाही**

**प्रश्न क्र. २० :** छत्रपती शिवाजीमहाराजांच्या वेळेपासून एकनिष्ठेने स्वराज्याची सेवा करणाऱ्या हंबीरराव मोहित्यांनी किती साली बलिदान दिले?

**१) १६८४ २) १६८५ ३) १६८६ ४) १६८७**

**प्रश्न क्र. २१ :** औरंगजेबाने संभाजीराजांना पकडण्यासाठी आपल्या कोणत्या सरदाराला पाठविले?

**१) जुल्फिकारखान**
**२) शेख निजाम उर्फ मुकर्रबखान**
**३) हिंमतखान**
**४) कासिमखान**

**प्रश्न क्र. २२ :** औरंगजेबाने आपला सर्वात मोठा शत्रू संभाजीराजाला कैद करून आपल्या समोर उभे केल्याचे बघितल्यानंतर .....

**१) त्याने आपला दरबार बरखास्त केला.**
**२) तो सिंहासनावरून उतरून गुडघे टेकून अल्लाचे आभार मानू लागला.**
**३) त्याने संभाजीराजांचे कौतुक केले.**
**४) त्याने राजांना आपला सरदार बनण्याची विनंती केली.**

**प्रश्न क्र. २३ :** संभाजीराजांची ..... या दिवशी निघृण हत्या करण्यात आली.

**१) ३ डिसेंबर १६८८** **२) ३ जानेवारी १६८९**
**३) ३ फेब्रुवारी १६८९** **४) ३ मार्च १६८९**

**प्रश्न क्र. २४ :** समर्थ रामदास स्वामींनी डिसेंबर १६८१च्या सुमारास छत्रपती संभाजीमहाराजांना शिवरायांच्या महानतेचे वर्णन करणारे काव्यरुप पत्र पाठविले होते. त्यातील श्लोक पूर्ण करा.
शिवरायांचे कैसे बोलणें। शिवरायांचे कैसे चालणें।
......................। कैसें असे।।

**१) सकळ लोक एक करावें**
**२) शिवरायाचे सलगी देणें**
**३) चढती वाढती पदवी**
**४) राज्यसाधनाची लगबग**

**प्रश्न क्र. २५ :** 'सहसा धर्मकृत्यास नाश करू नये. करतील त्यास महापातक आहे' असा उल्लेख छत्रपती संभाजीमहाराजांनी करून घेतलेल्या शिलालेखात आढळतो. हा शिलालेख कोठे आहे?

**१) रत्नागिरी** **२) रायगड**
**३) गोवा** **४) पुणे**

**प्रश्न क्र. २६ :** राजाराममहाराजांना जिंजीकडे जाताना नेमक्या कोणत्या राणीसाहेबांचे सहाय्य झाले?

**१) राणी लक्ष्मीबाई** **२) राणी सावित्रीबाई**
**३) राणी रायबागन** **४) राणी चन्नम्मा**

**प्रश्न क्र. २७ :** जिंजीच्या ३ बालेकिल्ल्यांपैकी कोणते नाव एकाही बालेकिल्ल्याला नव्हते.

**१) राजगिरी** **२) सूर्यगिरी**
**३) चंद्रगिरी** **४) कृष्णगिरी**

**प्रश्न क्र. २८ :** स्वतः जिंजीत अडकले असताना राजाराममहाराजांनी महाराष्ट्रात संघर्ष करणाऱ्या सेनाधिकाऱ्यांच्या मदतीला .... यांस चाळीस हजार सैन्य व एक लाख होनांचा खजिना देऊन पाठविले.

**१) रामण्णा** **२) केसो त्रिमल**
**३) धनाजी जाधव** **४) परशुरामपंत प्रतिनिधी**

**प्रश्न क्र. २९ :** जिंजीच्या वेढ्यात मदत करण्यासाठी औरंगजेबाने आपला वजीर आसदखान याच्याबरोबर कोणत्या शहजाद्याची नेमणूक केली होती?

**१) शहजादा अकबर**
**२) शहजादा अज्ज्ञम**
**३) शहजादा कामबक्ष**
**४) शहजादा बेदारबख्त**

**प्रश्न क्र. ३० :** १६९२ च्या सुमारास जिंजीच्या परिसरात झालेल्या जबरदस्त पराभवानंतर जुल्फिकारखानाने राजाराममहाराजांना ... पर्यंत माघार घेऊ देण्याची विनंती केली.

**१) वांदिवाश** **२) तंजावूर**
**३) वेलोर** **४) बेळगाव**

**प्रश्न क्र. ३१ :** मे १६९० च्या सुमारास अबुल खैरखानाचा पराभव करून मराठ्यांनी कोणता किल्ला जिंकला?

**१) प्रतापगड** **२) अजिंक्यतारा**

**३) राजगड** **४) लोहगड**

**प्रश्न क्र. ३२ :** इ.स. ..... च्या सुमारास संताजी घोरपडे यांना मराठ्यांच्या पराक्रमी लष्कराचे सेनापती घोषित केले गेले.

**१) १६८९** **२) १६९०**

**३) १६९१** **४) १६९२**

**प्रश्न क्र. ३३ :** १६९२ साली धनाजी जाधव यांनी जिंजीजवळ .... या मुघल सरदाराचा पराभव करून कैद केले.

**१) इस्माइलखान मखा** **२) जुल्फिकारखान**

**३) अलिमर्दाखान** **४) शहजादा अज्रम**

**प्रश्न क्र. ३४ :** तानाजी मालुसरेंसारखा पराक्रम करून १ जुलै १६९३ रोजी ..... यांनी सिंहगड किल्ला जिंकून पुन्हा स्वराज्यात आणला.

**१) शंकराजी नारायण** **२) सरदार नावजी बलकवडे**

**३) आबाजीपंत सबनीस** **४) मोरो नारायण**

**प्रश्न क्र. ३५ :** १६९५ मध्ये पुण्याजवळील बारा मावळांचा कारभार ----- हे पाहात होते.

**१) शंकराजी नारायण सचिव**

**२) नावजी बलकवडे**

**३) चाफाजी कदम**

**४) रामचंद्रपंत अमात्य**

**प्रश्न क्र. ३६ :** १६९५ साली संताजी घोरपडे यांची कासिमखानाशी कर्नाटकातील ..... ह्या जवळ लढाई झाली.

**१) अदोनी** **२) चित्रदुर्ग**

**३) गदग** **४) वांदिवाश**

**प्रश्न क्र. ३७ :** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठी राज्याचे रक्षण करणारे धुरंधर सेनानी संताजी घोरपडे यांचा ..... साली दुर्दैवी अंत झाला.

**१) १६९७ २) १६९८ ३) १६९९ ४) १७००**

**प्रश्न क्र. ३८ :** डिसेंबर १६९७ मध्ये जिंजीच्या किल्ल्यातून सुटका करून घेऊन राजाराममहाराज .... च्या किल्ल्याच्या आश्रयाला आले.

**१) रायगड** **२) वेलोर**

**३) लोहगड** **४) पुरंदर**

**प्रश्न क्र. ३९ :** १६९५च्या सुमारास ..... येथे दोन वर्षांसाठी औरंगजेब बादशहाची छावणी पडली होती.

**१) पन्हाळा** **२) रामसेज**

**३) औरंगाबाद** **४) ब्रह्मपुरी**

**प्रश्न क्र. ४० :** ३ मार्च, १७०० फाल्गुन वद्य नवमी रोजी राजाराममहाराजांचे निधन कोणत्या किल्ल्यावर झाले?

**१) पन्हाळा** **२) सिंहगड**

**३) कोरीगड** **४) विशाळगड**

**प्रश्न क्र. ४१ :** राजाराममहाराजांच्या पत्नी ताराराणी यांच्या वडिलांचे नाव काय होते?

**१) प्रतापराव गुजर** **२) हंबीरराव मोहिते**

**३) तानाजी मालुसरे** **४) विठोजी कारके**

**प्रश्न क्र. ४२ :** ताराबाईंनी आपला अल्पवयीन पुत्र शिवाजी (दुसरे) यांना राज्याभिषेक करून स्वराज्याचा कारभार हाती घेतला तेव्हा ताराबाईंचे वय ..... होते.

**१) वीस** **२) तेवीस**

**३) पंचवीस** **४) सत्तावीस**

**प्रश्न क्र. ४३ :** मार्च १७०६च्या सुमारास धनाजी जाधवांनी गुजरातवर आक्रमण करून मुघलांचे ..... हे संपन्न शहर लुटले.

**१) बडोदा** **२) सुरत**

**३) पोरबंदर** **४) जामनगर**

**प्रश्न क्र. ४४ :** वयाच्या ८९व्या वर्षी अपयशी ठरलेल्या औरंगजेबाचा मृत्यू कोठे झाला?

**१) औरंगाबाद** **२) नाशिक**

**३) पुणे** **४) अहमदनगर**

**प्रश्न क्र. ४५ :** रामचंद्रपंत अमात्यांचे मोरोपंत पिंगळे यांच्याशी कोणते नाते होते?

**१) जावई-सासरे** **२) मेव्हणे-मेव्हणे**

**३) मामा भाचे** **४) कोणतेही नाते नव्हते.**

**प्रश्न क्र. ४६ :** छत्रपती शिवाजीमहाराजांनी रामचंद्रपंतांची अमात्यपदावर वयाच्या .... व्या वर्षी नेमणूक झाली.

**१) २० २) २२ ३) २३ ४) २५**

**प्रश्न क्र. ४७ :** शंकराजी नारायण यांचेकडे स्वराज्यातील कोणत्या भागातील मुलुखाचा कारभार सोपविला होता?

**१) पूर्व** **२) पश्चिम**

**३) दक्षिण** **४) उत्तर**

**प्रश्न क्र. ४८ :** औरंगजेबाविरुद्ध झालेल्या संघर्षात अपयशी ठरल्याने त्याचा मुलगा अकबर याने नैराश्याने ..... ची वाट पकडली.

**१) जिंजी** **२) तुर्कस्तान**

**३) इराण** **४) श्रीलंका**

**प्रश्न क्र. ४९ :** औरंगजेबाच्या स्वारीच्या वेळी गोवळकोंड्याचा बादशहा अबुल हसनशी साटेलोटे केल्यामुळे औरंगजेबाने कोणत्या शहजाद्याला सात वर्षे तुरुंगवासाची शिक्षा दिली?

**१) अज्रम** **२) मुअज्रम**

**३) कामबक्ष** **४) शहा अलम**

**प्रश्न क्र. ५० :** मराठ्यांची ताकद ही त्यांच्या ताब्यात असलेल्या ..... एकवटली आहे अशी औरंगजेबाची समजूत होती.

**१) संपत्तीत** **२) शस्त्रांमध्ये**

**३) किल्ल्यांमध्ये** **४) सैन्यामध्ये**

●●●

# श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

# शिवचरित्र स्पर्धा

**छत्रपती शिवाजीमहाराज**
**इ. ११ वी, १२ वी व डिप्लोमा स्तर**

**दिनांक : शनिवार, १५ फेब्रुवारी २०२०** **एकूण गुण : १००** **वेळ : १ तास**

**सूचना :**

1) तुमची उत्तरे स्वतंत्रपणे दिलेल्या उत्तरपत्रिकेवर लिहा. त्यासाठी निळे किंवा काळे बॉलपेन वापरावे.
2) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य उत्तराच्या क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.

**उदा.** ● १ ○ २ ○ ३ ○ ४

3) जर तुमचे उत्तर चुकीचे आहे असे वाटल्यास व तुम्हाला दुरूस्त करावयाचे असेल तर चुकीच्या वर्तुळावर पुढे दाखविल्याप्रमाणे फुली मारा व योग्य वर्तुळ रंगवा. एकाच प्रश्नासाठी एकापेक्षा जास्त वर्तुळे रंगविल्यास गुण दिले जाणार नाहीत.

उदा. ⊗ 1 ○ 2 ○ 3 ○ 4

4) एकूण **50** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **2** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य.

---

**प्रश्न क्र. १ :** महाराष्ट्रातील देवगिरीकर यादवांचे राज्य सन ...... मध्ये संपुष्टात आले.

**१) ११९४ २) १२९४ ३) १३९४ ४) १४९४**

**प्रश्न क्र. २ :** मध्ययुगीन कालखंडात नर्मदेच्या उत्तरेच्या भागास .... या नावाने ओळखले जायचे.

**१) दख्खन २) हिंदुस्थान**
**३) कर्णावती ४) इंद्रप्रस्थ**

**प्रश्न क्र. ३ :** सन १६२९ मध्ये लखूजी जाधवराव आणि त्यांचे पुत्र अचलोजी, रघूजी आणि यशवंतराव यांचा खून कोणी केला?

**१) इब्राहिम आदिलशाह २) दर्याखान रोहिला**
**३) निजामशहा ४) यापैकी कोणीही नाही.**

**प्रश्न क्र. ४ :** शिवजन्माच्या जन्म संवत्सराचे नाव काय होते?

**१) शुक्ल २) आनंद ३) रौद्र ४) विलंबी**

**प्रश्न क्र. ५ :** १६३३ मध्ये मुघलांनी निजामशाहीची राजधानी जिंकली. त्याचे नाव काय होते?

**१) अहमदनगर २) जुन्नर**
**३) रायगड ४) दौलताबाद**

**प्रश्न क्र. ६ :** १६३६ सालच्या तहान्वये भीमेच्या उत्तरेकडील प्रदेश कोणाला मिळाला?

**१) आदिलशाही २) निजामशाही**
**३) कुतुबशाही ४) मुघल**

**प्रश्न क्र. ७ :** शाहजीराजांना पुणे परगण्याचा मुकासा मिळाला होता. त्यात किती गावे होती?

**१) २५ २) २९० ३) ८०० ४) ७१९**

**प्रश्न क्र. ८ :** शिवबा दहा वर्षांचे झाले असताना त्यांचा विवाह कोणाशी झाला?

**१) सगुणाबाई २) सोयराबाई**
**३) सईबाई ४) सकवारबाई**

**प्रश्न क्र. ९ :** जुन्नरखाली .... मावळे आहेत आणि पुण्याखाली बारा मावळे आहेत.

**१) १६ २) १४ ३) १२ ४) १०**

**प्रश्न क्र. १० :** शिवाजी महाराजांच्या काळात बलुतेदार आणि आलुतेदार किती असत?

**१) १२ आणि ६ २) १२ आणि १२**
**३) १८ आणि १२ ४) १२ आणि १८**

**प्रश्न क्र. ११ :** दादाजी कोंडदेव हे शाहजीराजांचे खाजगी नोकर असले तरी ते किल्ले .... नामजाद सुभेदार होते.

**१) लोहगड २) विसापूर**
**३) कोंढाणा ४) राजगड**

**प्रश्न क्र. १२ :** शिवाजी महाराजांच्या कार्यालयातून बाबाजी गुजर यांना शिक्षा करण्यासाठी पाठविलेले पत्र कोणत्या सालातील आहे?

**१) १६४४ २) १६४५ ३) १६४६ ४) १६४७**

**प्रश्न क्र. १३ :** शाहजीराजे, जिजामाता यांच्या मुद्रा कोणत्या भाषेत होत्या?

**१) मराठी २) संस्कृत ३) उर्दू ४) फार्सी**

**प्रश्न क्र. १४ :** शाहजीराजांना कैद करण्याची जबाबदारी आदिलशाहाने कोणावर सोपविली?

**१) मुस्तफाखान २) सिद्दी मसूद**
**३) फाजलखान ४) मिया रहीम मुहम्मद**

**प्रश्न क्र. १५ :** फतहखानाच्या स्वारीचे वेळी (१६४८-४९) खालीलपैकी कोणता किल्ला शिवरायांच्या राज्यात नव्हता?

**१) कोंढाणा २) शिरवळ**
**३) पुरंदर ४) रोहिडा**

**प्रश्न क्र. १६ :** फतहखानाच्या स्वारीच्या वेळेस पुरंदरावर गोदाजी जगतापने .... ह्याच्या दोन चिरफाकळ्या उडविल्या आणि ठार केले.

**१) फाजलखान** **२) मुसेखान**
**३) फतहखान** **४) फरहादखान**

**प्रश्न क्र. १७ :** १६४९ मध्ये शाहजीराजांच्या सुटकेच्या बदल्यात आदिलशाहाला ही ठिकाणे द्यावी लागली?

**१) कंदर्पी** **२) बंगळूर**
**३) कोंढाणा** **४) कंदर्पी, कोंढाणा, बंगळूर ही सर्व**

**प्रश्न क्र. १८ :** शाहजीराजांबरोबर कैदेतून सुटका झालेले दादाजी कृष्ण लोहोकरे यांना शाहजीराजांनी ....

**१) नोकरीतून बडतर्फ केले.**
**२) शिवाजीराजांना स्वराज्याच्या कार्यात मदत करण्यासाठी पाठविले.**
**३) पुन्हा आपल्या पदरी ठेवून घेतले.**
**४) यापैकी काही नाही.**

**प्रश्न क्र. १९ :** जावळीच्या चंद्रराव मोरे यांचा पराभव करून शिवाजीराजांनी जावळी --- या दिवशी जिंकून घेतली.

**१) १५ जानेवारी १६५६** **२) १५ ऑगस्ट १६५६**
**३) ३ एप्रिल १६८०** **४) १९ फेब्रुवारी १६३०**

**प्रश्न क्र. २० :** शिवाजीराजांनी कोयनेच्या खोऱ्यात भोरप्या डोंगरावर कोणता किल्ला बांधला?

**१) प्रतापगड** **२) अजिंक्यतारा**
**३) पन्हाळा** **४) विशाळगड**

**प्रश्न क्र. २१ :** अफझलखानाच्या हाती लागलेला शहजादा औरंगजेब याला ----- याच्यामुळे सोडून द्यावे लागले.

**१) शिवाजीराजे** **२) आदिलशाहा**
**३) बाजी घोरपडे** **४) खान मुहम्मद**

**प्रश्न क्र. २२ :** बादशहा झाल्यावर औरंगजेबाने स्वतःला कोणता किताब घेतला?

**१) शहेनशहा** **२) आलमगीर**
**३) बादशहा** **४) यापैकी कोणताच नाही.**

**प्रश्न क्र. २३ :** शिवाजीमहाराजांनी स्वतंत्र मराठी आरमाराचा प्रारंभ १६५७ मध्ये ------ येथे केला.

**१) कल्याण-भिवंडी-पेण** **२) देवगड, विजयदुर्ग**
**३) सिंधुदुर्ग** **४) मुरूड-जंजिरा**

**प्रश्न क्र. २४ :** रुय लेंताव व्हिएगश आणि त्याचा मुलगा फेर्नाव व्हिएगश या दोघांनी ३४० .... कारागिरांच्या मदतीने मराठ्यांना २० लढाऊ गलबते बांधून दिली.

**१) डच** **२) इंग्रज** **३) पोर्तुगिज** **४) सिद्दी**

**प्रश्न क्र. २५ :** अफझलखानाच्या बाजूने शिवरायांवरील मोहीमेत मावळातील उन्नवळीचे ----- हे देशमुख सामील झाले होते.

**१) कान्होजी जेधे** **२) कृष्णाजी बांदल**
**३) चंद्रराव मोरे** **४) खंडोजी खोपडे**

**प्रश्न क्र. २६ :** अफझलखानाचे मस्तक कोणी कापले?

**१) शिवाजीमहाराज** **२) जिवा महाले**
**३) संभाजी कावजी** **४) यंसाजी कंक**

**प्रश्न क्र. २७ :** अफझलखानाच्या निर्दालनानंतर प्रतापगडाहून निघालेल्या शिवाजीराजांनी पन्हाळगड --- रोजी जिंकला.

**१) २८ नोव्हेंबर १६५९** **२) १० नोव्हेंबर १६५९**
**३) १३ जुलै १६६०** **४) ५ एप्रिल १६६३**

**प्रश्न क्र. २८ :** आंगद हनुमान रघुनाथाला। तैसे जेधे बांदल शिवाजी राजाला।। ही औळ लिहिणारा शाहीर कोण होता?

**१) शाहीर भूषण** **२) शाहीर अज्ञानदास**
**३) शाहीर परमानंद** **४) यापैकी कोणीही नाही.**

**प्रश्न क्र. २९ :** राजापूर येथील इंग्रजांची वखार लुटून हेन्री रिव्हिंग्टन, रँडॉल्फ टेलर, रॉबर्ट फेराण्ड, रिचर्ड नेपियर, रिचर्ड टेलर, फिलिप गिफर्ड, रॉबर्ट वार्ड, विलियम मिंघॅम यांना पकडून शिवरायांनी कोणत्या किल्ल्यावर कैदेत ठेवले?

**१) मानगड** **२) सोनगड**
**३) चांभारगड** **४) रायगड**

**प्रश्न क्र. ३० :** प्रतापगडावर शिवाजीराजांनी ------ भवानीदेवीच्या मूर्तीची स्थापना केली.

**१) अफझलखान वधापूर्वी**
**२) अफझलखान वधानंतर**
**३) आग्रा येथून परत आल्यावर**
**४) दक्षिण दिग्विजयानंतर**

**प्रश्न क्र. ३१ :** चाकणचा किल्ला शायस्ताखानाच्या मुघल सैन्याशी किती दिवस लढला?

**१) ५२** **२) ५६** **३) ६०** **४) ६६**

**प्रश्न क्र. ३२ :** ज्यांनी अगदी लहानपणापासून लालमहाल पाहिला आहे असे .... हे महाराजांचे लहानपणीचे सवंगडी शायस्ताखानाच्या छाप्याच्या वेळी सोबत होते.

**१) तानाजी मालुसरे** **२) मुरारबाजी**
**३) चिमणाजी देशपांडे** **४) यापैकी कोणीही नाही.**

**प्रश्न क्र. ३३ :** शिवाजीराजांनी सुरतेची पहिली लूट केली, तेव्हा सुरतेचा मोगली किल्लेदार व कारभारी ------ हा होता.

**१) अफझलखान** **२) शायस्ताखान**
**३) सर्जाखान** **४) इनायतखान**

**प्रश्न क्र. ३४ :** 'माझ्या भूमीचे रक्षण करणे हे माझे आद्य कर्तव्य आहे' अशा आशयाचे पत्र शिवाजीमहाराजांनी कोणाला लिहिले?

**१) इंग्रज** **२) आदिलशाहा**
**३) मुघल** **४) पोर्तुगिज**

**प्रश्न क्र. ३५ :** ''शेरखानाने आमची होळीची शिकार घालविली.'' असे शिवाजीमहाराज कोणत्या स्वारीच्या वेळेस म्हणाले?

**१) सूरत** **२) बसरूर**
**३) जंजिरा** **४) कल्याण-भिवंडी**

**प्रश्न क्र. ३६ :** मिर्झाराजे जयसिंह वयाच्या कितव्या वर्षी जहांगिराच्या सेवेत सामील झाले होते?

**१) ८ २) १२ ३) १६ ४) २०**

**प्रश्न क्र. ३७ :** पुरंदर किल्ल्याचे कोणते विभाग मानले जातात?

**१) वज्रगड/रुद्रमाळ २) माची**

**३) बालेकिल्ला ४) हे सर्व भाग**

**प्रश्न क्र. ३८ :** ''असा शिपाई खुदाने पैदा केला.'' असे उद्गार कोणी कोणाबद्दल काढले?

**१) उदयभानने तानाजींबद्दल**

**२) मिर्झाराजांनी बाजीप्रभुंबद्दल**

**३) मिर्झाराजांनी मुरारबाजींबद्दल**

**४) दिलीरखानाने मुरारबाजींबद्दल**

**प्रश्न क्र. ३९ :** शिवरायांचे आग्रा शहरात औरंगजेबातर्फे स्वागत कोणी केले?

**१) मिर्झाराजे जयसिंह २) रामसिंग**

**३) मुन्शी गिरधरलाल ४) यापैकी कोणीही नाही**

**प्रश्न क्र. ४० :** इराणच्या बादशहाने पाठविलेल्या पत्रात औरंगजेबाचे वर्णन 'बापाला पकडून ठेवणारा' असे केले आहे. ह्यासाठी पत्रात कोणता शब्द वापरला आहे?

**१) आलमगीर २) पिदरगीर**

**३) अमीर उल उमरा ४) शिकंदे बुनियादे बुतान**

**प्रश्न क्र. ४१ :** मिर्झाराजांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचा साथीदार उदयराज मुन्शी यांनी इस्लाम धर्म स्वीकारल्यावर कोणते नाव घेतले?

**१) शहरयारखान २) तलिरयारखान**

**३) मुहम्मद कुलीखान ४) दिलीरखान**

**प्रश्न क्र. ४२ :** मराठी सैन्यात ज्याला घोडे सरकारातून मिळत त्यास काय म्हणत?

**१) शिलेदार २) हवालदार**

**३) बारगीर ४) नाईक**

**प्रश्न क्र. ४३ :** गडकोटांच्या दुरुस्तीकरीता किती होन राखीव निधीची तरतूद महाराजांनी केली होती?

**१) एक लाख पंचवीस हजार**

**२) एक लाख पन्नास हजार**

**३) एक लाख पंच्याहत्तर हजार**

**४) दोन लाख**

**प्रश्न क्र. ४४ :** ग्रंथ व लेखक, अशा खालील जोड्यांपैकी नेमकी कोणती जोडी चुकीची आहे?

**१) शिवभारत – परमानंद गोविंद नेवासकर**

**२) कवी भूषण – शिवराज भूषण**

**३) करण कौस्तुभ – कृष्ण ज्योतिषी**

**४) गागाभट्ट – शिवप्रशस्ती**

**प्रश्न क्र. ४५ :** औरंगजेबाच्या आज्ञेवरून खालीलपैकी हिंदूंचे कोणते पवित्र मंदिर पाडले गेले नाही?

**१) अयोध्येचे राम मंदिर**

**२) वाराणसीचे काशीविश्वेश्वर मंदिर**

**३) मथुरेतील केशवराय मंदिर**

**४) यापैकी एकही नाही.**

**प्रश्न क्र. ४६ :** सरदार तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमामुळे सिंहगड किल्ला किती साली स्वराज्यात आला?

**१) १६६७ २) १६७० ३) १६७३ ४) १६७६**

**प्रश्न क्र. ४७ :** कोंडाजी फर्जंद यांनी किती मावळ्यांच्या सहाय्याने पन्हाळा किल्ला जिंकून घेतला?

**१) सोळाशे २) सहाशे**

**३) साठ ४) सोळा हजार**

**प्रश्न क्र. ४८ :** प्रतापराव गुजर सेनापतींचा बहलोलखान याच्याशी झुंज घेताना कोठे मृत्यू झाला?

**१) पन्हाळा २) नेसरी**

**३) पावनखिंड ४) रायगड**

**प्रश्न क्र. ४९ :** मार्च १६७७ मध्ये पूर्वीचे वैर विसरून एकत्र येण्यासाठी महाराजांनी मुधोळकर बाजी घोरपड्यांचे चिरंजीव यांना पत्र लिहिले. त्यांचे नाव काय?

**१) संताजी घोरपडे २) मालोजी घोरपडे**

**३) बाबाजी घोरपडे ४) धनाजी घोरपडे**

**प्रश्न क्र. ५० :** राजाराममहाराजांची पत्नी जानकी कोणाची मुलगी होती?

**१) कान्होजी जेधे २) नेतोजी पालकर**

**३) प्रतापराव गुजर ४) सूर्यराव काकडे**

● ● ●

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ

# शिवचरित्र स्पर्धा

**स्वराज्यरक्षणाचा लढा**
**पदवी व पदव्युत्तर स्तर**

**दिनांक : शनिवार, १५ फेब्रुवारी २०२०**

**एकूण गुण : १००**
**वेळ : १ तास**

**सूचना :**

1) तुमची उत्तरे स्वतंत्रपणे दिलेल्या उत्तरपत्रिकेवर लिहा. त्यासाठी निळे किंवा काळे बॉलपेन वापरावे.

2) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य उत्तराच्या क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.

उदा. ● १ ○ २ ○ ३ ○ ४

3) जर तुमचे उत्तर चुकीचे आहे असे वाटल्यास व तुम्हाला दुरूस्त करावयाचे असेल तर चुकीच्या वर्तुळावर पुढे दाखविल्याप्रमाणे फुली मारा व योग्य वर्तुळ रंगवा. एकाच प्रश्नासाठी एकापेक्षा जास्त वर्तुळे रंगविल्यास गुण दिले जाणार नाहीत.

उदा. ⊗ 1 ○ 2 ○ 3 ○ 4

4) एकूण **50** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **2** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य.

---

**प्रश्न क्र. १ :** श्री शिवछत्रपतींचे अकाली निधन नेमके कोणत्या तिथीला झाले?

**१) फाल्गुन वद्य तृतीया २) वैशाख शुद्ध द्वितीया**
**३) चैत्र शुद्ध पौर्णिमा ४) ज्येष्ठ शुद्ध चतुर्दशी**

**प्रश्न क्र. २ :** संभाजीराजांनी दि. ...... रोजी रायगडावर राज्याभिषेक करून स्वतःस छत्रपती घोषित केले?

**१) १६ जानेवारी १६८१**
**२) १६ जानेवारी १६८२**
**३) १६ डिसेंबर १६८०**
**४) यापैकी कोणतीही नाही.**

**प्रश्न क्र. ३ :** संभाजीराजांनी राजनीतीवरील ....... या संस्कृत ग्रंथाची निर्मिती केली?

**१) नखशिख २) बुधभूषणम्**
**३) सातशतक ४) यापैकी कोणताही नाही.**

**प्रश्न क्र. ४ :** १६७३ साली रायगडावर संभाजीराजांनी रायगडावर इंग्रजांचा वकील ...... याच्याशी वाटाघाटी केल्या.

**१) हेन्री ऑक्झिडन २) टॉमस निकल्स**
**३) प्रॉथर ४) लॅमिंग्टन**

**प्रश्न क्र. ५ :** औरंगजेबाविरुद्धच्या संघर्षात इंग्रजांकडून मदत व्हावी म्हणून संभाजीराजांनी ..... मध्ये इंग्रजांशी मैत्रीचा तह केला.

**१) डिसेंबर १६८४ २) नोव्हेंबर १६८४**
**३) ऑक्टोबर १६८४ ४) सप्टेंबर १६८४**

**प्रश्न क्र. ६ :** पोर्तुगिजांनी व्यापाराच्या नावाखाली भारतात प्रवेश करून सत्ता प्रस्थापित केली. त्यांच्या राज्याला ..... असे म्हटले जात होते?

**१) बागलाण २) बारदेश**
**३) फिरंगाण ४) खानदेश**

**प्रश्न क्र. ७ :** संभाजीराजांनी १० जुलै १६८३ च्या सुमारास कोणाच्या नेतृत्वाखाली मध्य कोकणातील रेवदंडा चौलच्या किल्ल्यांवर आक्रमण करावयास आपले सैन्य पाठविले?

**१) सोनोपंत डबीर २) हंबीरराव मोहिते**
**३) दादाजी रघुनाथ प्रभू ४) निळोपंत पेशवे**

**प्रश्न क्र. ८ :** फोंडा किल्ल्यावरील मोहीमेत शंभूछत्रपतींनी स्वतःचा घोडा कोणत्या नदीच्या खाडीत घातला?

**१) कुंडलिका २) मांडवी**
**३) शास्त्री ४) वसिष्ठी**

**प्रश्न क्र. ९ :** संभाजीराजांच्या आक्रमणाने घाबरलेल्या पोर्तुगिजांनी शरण येऊन केलेल्या तहात पुढील अटी मान्य केल्या.

**१) मराठ्यांच्या मुलुखावर आक्रमण करणार नाही.**
**२) हिंदुंवर अत्याचार करणार नाही.**
**३) धर्मांतरण करणार नाही.**
**४) पर्याय क्र. १,२ आणि ३ मधील सर्व**

**प्रश्न क्र. १० :** संभाजीराजे जंजिरेकर सिद्दीविरुद्धची मोहीम अंतिम टप्प्यात आली असतानाही स्थगित करून मुघलांविरुद्ध ..... कडे निघाले.

**१) दीव, दमण २) विजापूर**
**३) पन्हाळा ४) कल्याण, भिवंडी**

**प्रश्न क्र. ११ :** शंभूछत्रपतींचे विश्वासू सेनापती हंबीरराव मोहिते यांचा मृत्यू मुघली सरदार सर्जाखानाशी लढताना कोणत्या परिसरात झाला?

**१) रायगड २) वाई**
**३) सातारा ४) कोल्हापूर**

**प्रश्न क्र. १२ :** मुघलांच्या सैन्याने संभाजीराजांना ...... जवळ पकडले.

**१) पोलादपूर** **२) मंडणगड**
**३) मलकापूर** **४) संगमेश्वर**

**प्रश्न क्र. १३ :** संभाजीराजांना पकडले तेव्हा झालेल्या धुमश्चक्रीत मराठा सरनोबत ..... यांनी प्राणांचे बलिदान दिले.

**१) जिवा महाले** **२) संताजी घोरपडे**
**३) म्हाळोजी घोरपडे** **४) कवी कलश**

**प्रश्न क्र. १४ :** संभाजीमहाराजांच्या कारकिर्दीत न्यायाधीश म्हणून कोणाला नियुक्त केले गेले?

**१) प्रल्हाद निराजी** **२) खंडोबल्लाळ**
**३) दत्ताजी त्रिमल** **४) शंकराजी नारायण**

**प्रश्न क्र. १५ :** छत्रपती संभाजीमहाराजांनी बाकरे शास्त्रींना २४ ऑगस्ट १६८० रोजी दिलेल्या संस्कृत भाषेतील दानपत्रात 'हिंदू धर्म जीर्णोद्धार करणारे, म्लेंच्छांचा विनाश करणारे' असे वर्णन कोणासाठी केले आहे.

**१) आपले पणजोबा मालोजीराजे**
**२) आपले आजोबा शहाजीराजे**
**३) सरसेनापती हंबीरराव मोहिते**
**४) आपले वडील छत्रपती शिवाजीमहाराज**

**प्रश्न क्र. १६ :** 'तुमची चाकरी हिमतीची पाहून आम्ही संतोषाने ही देणगी देत आहोत' असे गौरवोद्गार संभाजीराजांनी कोणाला उद्देशून काढले?

**१) धनाजी जाधव** **२) शंकराजी नारायण**
**३) हंबीरराव मोहिते** **४) संताजी घोरपडे**

**प्रश्न क्र. १७ :** ''संभाजी हा शिवाजीपेक्षा औरंगजेब आणि मुघलांसाठी दहापटीने अधिक त्रासदायक शत्रू ठरला'' असे कोणत्या समकालीन मुघल इतिहासकाराने म्हटले आहे?

**१) खाफीखान** **२) भीमसेन सक्सेना**
**३) साकी मुस्तैदखान** **४) रामचंद्रपंत अमात्य**

**प्रश्न क्र. १८ :** पन्हाळ्यावरून सुटका करून घेऊन राजाराममहाराज जिंजीला ..... च्या सुमारास सुखरुप पोहोचले.

**१) १ सप्टेंबर १६८९** **२) १ ऑक्टोबर १६८९**
**३) १ नोव्हेंबर १६८९** **४) १ डिसेंबर १६८९**

**प्रश्न क्र. १९ :**. राजाराममहाराजांनी जिंजीच्या किल्ल्याचा आश्रय घेतला असताना त्याला वेढा देणाऱ्या मुघल सरदाराचे नाव काय होते?

**१) कासिमखान** **२) जुल्फिकारखान**
**३) अलिमर्दाखान** **४) सर्जाखान**

**प्रश्न क्र. २० :** एप्रिल १६९० च्या सुमारास संताजी घोरपडेंनी साताऱ्याच्या किल्ल्याजवळ कोणत्या मुघल सरदाराचा पराभव केला?

**१) असदखान** **२) सर्जाखान**
**३) जाननिसारखान** **४) तहव्वूरखान**

**प्रश्न क्र. २१ :** जिंजीला जाताना राजाराममहाराजांना मदत केली म्हणून राणी चन्नम्मावर औरंगजेबाने जाननिसारखानाला आक्रमणासाठी पाठविले. त्याचा वाटेतच पराभव कोणी केला?

**१) संताजी घोरपडे** **२) नेमाजी शिंदे**
**३) धनाजी जाधव** **४) रामचंद्रपंत अमात्य**

**प्रश्न क्र. २२ :** जिंजीच्या किल्ल्यातील वेढ्याला मदत म्हणून १६९१ साली औरंगजेबाने कोणाला पाठविले?

**१) असदखान आणि कामबक्ष**
**२) असदखान आणि सर्जाखान**
**३) सर्जाखान आणि कामबक्ष**
**४) असदखान आणि खैरखान**

**प्रश्न क्र. २३ :** औरंगजेबाने राजगड किल्ल्यावर किल्लेदार म्हणून नेमलेल्या मुघल सरदाराचे नाव काय होते? (ज्याने तो किल्ला न लढवताच मराठ्यांना दिला)

**१) रुहुल्लाखान** **२) शहाबुद्दीनखान**
**३) अबुल खैरखान** **४) मातब्बरखान**

**प्रश्न क्र. २४ :** ''राजश्री राजाराममहाराजांनी कर्नाटकात जाऊन प्रकट होऊन लष्कर जमाव केला ...... आता श्रीकृपेने आपल्या राज्याचा मामला थाटत चालला आहे' ही वाक्ये कोणाच्या पत्रात आली आहेत?

**१) महादजी शामराज**
**२) रामचंद्रपंत अमात्य**
**३) शंकराजी नारायण सचिव**
**४) धनाजी जाधव**

**प्रश्न क्र. २५ :** १६९२ साली संताजी घोरपडे यांनी अलिमर्दाखान याचा ..... किल्ल्याच्या परिसरात पराभव करून कैद केले.

**१) जिंजी** **२) गोवळकोंडा**
**३) विजापूर** **४) कावेरीपाक**

**प्रश्न क्र. २६ :** मुघलांनी जिंकलेला पन्हाळा पुन्हा स्वराज्यात कोणी आणला?

**१) परशुराम त्र्यंबक (प्रतिनिधी)**
**२) रामचंद्रपंत अमात्य**
**३) धनाजी जाधव**
**४) संताजी घोरपडे**

**प्रश्न क्र. २७ :** राजाराममहाराज जिंजीमध्ये असताना तंजावूर येथे कोणती व्यक्ती अधिपती होती किंवा त्यांचे राज्य होते?

**१) शहाजीराजे** **२) व्यंकोजीराजे**
**३) संभाजीराजे** **४) मालोजीराजे**

**प्रश्न क्र. २८ :** ''आम्ही मराठ्यांनी मुघलांविरुद्ध आजपर्यंतच्या संघर्षात पूर्ण विजय मिळविला आहे. .... '' असे पत्र छत्रपती राजाराममहाराजांनी कोणाला पाठविले?

**१) औरंगजेब**
**२) रामचंद्रपंत अमात्य**
**३) मद्रासचा इंग्रज गव्हर्नर**
**४) तंजावूरकर शहाजीराजे**

**प्रश्न क्र. २९ :** रायगड, राजगड, सिंहगड, पुरंदर, तोरणा, रोहिडा हे महत्त्वाचे किल्ले मुघलांच्या ताब्यात गेल्यामुळे काही काळ शंकराजी नारायण पंतसचिव यांनी कोणत्या किल्ल्यावरून पुणे प्रांत व बारा मावळांचा कारभार पाहिला?

**१) मल्हारगड** **२) कोरीगड**
**३) राजमाची** **४) लोहगड**

**प्रश्न क्र. ३० :** १६९५ साली संताजी घोरपडे यांच्याशी झालेल्या लढाईत पराभूत झाल्यानंतर कासिमखानाने ..... च्या गढीचा आश्रय घेतला.

**१) चाकण** **२) कावेरीपाक**
**३) मलठण** **४) दोड्डेरी**

**प्रश्न क्र. ३१ :** जानेवारी १६९६ मध्ये बसवापट्टणजवळ झालेल्या लढाईत .... हा मुघल सरदार संताजी घोरपडेंकडून मारला गेला.

**१) इस्माइलखान** **२) सर्जाखान**
**३) हिंमतखान** **४) असदखान**

**प्रश्न क्र. ३२ :** ''जिंजीच्या परिसरात मराठ्यांची संख्या वाढतच चालली असून आता इथून ते अन्य भागातही सैन्य पाठवित आहेत. ..... लवकरच इथे मराठ्यांचे संपूर्ण वर्चस्व निर्माण होईल.'' असा उल्लेख कोणाच्या पत्रात आहे.

**१) जुल्फिकारखान** **२) तंजावूरचे शहाजीराजे**
**३) शहजादा कामबक्ष** **४) मद्रासकर इंग्रज**

**प्रश्न क्र. ३३ :** ऑगस्ट १६९८ मध्ये धनाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुघलांचे संपन्न शहर ..... लुटून फस्त केले.

**१) औरंगाबाद** **२) सूरत**
**३) बुऱ्हाणपूर** **४) आग्रा**

**प्रश्न क्र. ३४ :** १६९८ मध्ये मुघलांच्या ताब्यातील नंदुरबार शहरावर ..... या मराठा सरदाराने जबरदस्त हल्ला केला.

**१) नेमाजी शिंदे**
**२) राव दल्पत बुंदेला**
**३) परशुरामपंत प्रतिनिधी**
**४) बहिर्जी घोरपडे**

**प्रश्न क्र. ३५ :** ४ जून १६९१ रोजी हणमंतराव घोरपडे व कृष्णाजी घोरपडे ह्या मुघलांकडून पुन्हा स्वराज्यात येऊ इच्छिणाऱ्या सरदारांना पाठविलेल्या पत्रात राजाराममहाराजांनी दिल्ली जिंकल्यावर किती होन देण्याचे आश्वासन दिले होते?

**१) २,५०,०००** **२) ६२,५००**
**३) १,२५,०००** **४) १,७५,०००**

**प्रश्न क्र. ३६ :** महाराणी ताराबाई यांच्या माहेरचे आडनाव काय होते?

**१) घोरपडे** **२) जाधव**
**३) मोहिते** **४) शिंदे**

**प्रश्न क्र. ३७ :** वाकीनखेड्याचे संस्थानिक कोण होते? (त्यांचा पराभव १७०५ मध्ये औरंगजेबाने केला)

**१) नाझरअली** **२) जयचामराज वाडियार**
**३) पेड्डापिडीयानायक** **४) पेरुमलनायक**

**प्रश्न क्र. ३८ :** औरंगजेबाचे निधन ..... रोजी अहमदनगरजवळ भिंगार येथे झाले.

**१) २० जानेवारी १७०७**
**२) २० फेब्रुवारी १७०७**
**३) २० मार्च १७०७**
**४) २० एप्रिल १७०७**

**प्रश्न क्र. ३९ :** औरंगजेबाच्या खास सजविलेल्या तंबूला काय संबोधत?

**१) तख्तेरवाँ** **२) शामियाना**
**३) गुलालबार** **४) खाशाचा तंबू**

**प्रश्न क्र. ४० :** सज्जनगड जिंकल्यावर औरंगजेबाने त्याचे कोणते नाव रुढ केले?

**१) नवरसतारा** **२) आजमतारा**
**३) किलीद-इ-फतह** **४) फुतुहुल्हौब**

**प्रश्न क्र. ४१ :** १६९२ मध्ये जिंजीच्या पायथ्याशी धनाजी जाधवांनी ..... ह्या मुघल सरदाराचा पराभव केला.

**१) अलिमर्दाखान** **२) कासिमखान**
**३) इस्माइलखान** **४) जाननिसारखान**

**प्रश्न क्र. ४२ :** आपण नेमाजी शिंदेंचा पराभव केला अशी खोटी बातमी बादशहाला पाठविणाऱ्या ..... याची 'सिपाहसालार' ही पदवी वस्तुस्थिती समजल्यावर औरंगजेबाने काढून घेतली.

**१) फिरोजजंग** **२) जुल्फिकारखान**
**३) हुसेन अलिखान** **४) हिंमतखान**

**प्रश्न क्र. ४३ :** ''मोगलांचे घोडे पाण्यावर आले असता पाणी न पीत त्यांस मोंगली लोकांनी काय म्हणावे जे, पाण्यामध्ये धनाजी व संताजी दिसतो की काय? असे कोणी लिहिलेल्या बखरीत म्हटले आहे?

**१) सभासद**
**२) रामचंद्रपंत अमात्य**
**३) मल्हार रामराव चिटणीस**
**४) भीमसेन सक्सेना**

**प्रश्न क्र. ४४ :** रामचंद्रपंत अमात्य आणि अण्णाजी दत्तो सचिव यांनी महसुलासाठी नियम ठरवून सुरु केलेली ..... ही व्यवस्था शेतकरी बांधवांसाठी सुखकारक ठरली.

**१) करबंदी** **२) धाराबंदी**
**३) शेतसाराबंदी** **४) वतनदारी**

**प्रश्न क्र. ४५ :** सलग पाच छत्रपतींच्या सेवेत असलेल्या रामचंद्रपंत अमात्यांनी महाराष्ट्राला ललामभूत असणारा .... हा अद्वितीय ग्रंथ निर्माण केला.

**१) मराठा कुळाचा इतिहास**
**२) आज्ञापत्र**
**३) बुधभूषणम्**
**४) सातशतक**

**प्रश्न क्र. ४६ :** औरंगजेबाला दक्षिण हिंदुस्थानचा सुभेदार म्हणून प्रथम किती साली नेमले गेले?

**१) १६३२ २) १६३६ ३) १६४० ४) १६४४**

**प्रश्न क्र. ४७ :** दिल्लीची सत्ता बळकविण्यासाठी औरंगजेबाने आपल्या भावांपैकी कोणाची हत्या केली?

**१) मुराद**

**२) दारा**

**३) शुजा**

**४) पर्याय क्र. १,२,३ मधील तिघेही**

**प्रश्न क्र. ४८ :** १६८६ साली विजापूरच्या आदिलशहाने शरणागती पत्करल्यावर औरंगजेबाने काही काळ त्याला कोणत्या किल्ल्यातील तुरुंगात ठेवले?

**१) पन्हाळा** **२) दौलताबाद**

**३) गोवळकोंडा** **४) नळदुर्ग**

**प्रश्न क्र. ४९ :** मराठ्यांविरुद्धच्या युद्धात औरंगजेबाचा निधी आणि आणि संपत्ती संपली. त्यामुळे ..... प्रांतातून आलेल्या महसूलावर त्याचे कसेबसे भागविले जायचे.

**१) माळवा २) विजापूर ३) काश्मीर ४) बंगाल**

**प्रश्न क्र. ५० :** 'संपूर्ण राज्यावर आता मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यांनी सर्व रस्त्यांची नाकेबंदी केली.' हे वर्णन कोणत्या मुघल इतिहासकाराने लिहिले आहे.

**१) निकोलाय मनुची**

**२) भीमसेन सक्सेना**

**३) खाफीखान**

**४) हमीदउद्दीनखान**

● ● ●